**<u>निशाणी ५ व ३० खालील सामाईक आदेश</u>**

१. वादीने निशाणी क्र. ५ खालील अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा अर्ज कलम १अ ते १फ (१) या मिळकतीमधील वादींच्या प्रतिवादी बरोबर असणाऱ्या समाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अथवा ती तबदील अथवा तिचेवर बोजा निर्माण करु नये यासाठी तुर्तातुर्त मनाईसाठी दिलेला आहे. तर, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी क्र. ३० खालील अर्ज हा वादीने त्याच्या दाव्यामध्ये कलम १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण मिळकती व प्रस्तुत अर्जातील कलम १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण मिळकतीमधील एकत्र कुटुंबाच्या वहिवाटीतून त्यांना हुसकावून लावू नये व तबदील करु नये अथवा बोजा निर्माण करु नये. तसेच अर्ज कलम १अ व १ब मध्ये नमूद मिळकतीमधील संस्थेच्या कारभारात सहभागी होण्यास व दररोजची कामे करण्यास प्रतिवादी क्र. १ व ४ (प्रतिदाव्यातील) यांनी बेकायदेशीरपणे हुसकावून लावू नये व प्रतिबंध करु नये तसेच संस्थेच्या कारभारात अधिकार पदाचा गैरवापर करुन ढवळाढवळ करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>वादीचा अर्ज निशाणी ५ मधील कथने व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे खालीलप्रमाणेः</u>**

२. वादीचे असे कथन आहे की, त्यांचे व प्रतिवादी यांचे हिंदू एकत्र कुटुंब

आहे. त्यांचे दरम्यान अद्याप एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. दावा कलम १अ ते १ई या मिळकतीं एकत्र हिंदू कुटुंबाच्या मिळकती आहेत. त्यापैकी काही मिळकती वडिलार्जीत असून, काही मिळकती एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून कुटुंबाच्या सोयीसाठी प्रतिवादीच्या नावे खरेदी केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र. १, २, ५ व ६ यांच्या नावे वेगवेगळ्या कारखान्यास ऊस गळीतास गेलेला आहे. गट नं. ४८७ पैकी वादीचे नावे ऊसाची लागण नोंद दिलेली आहे. तसेच वडील विजयकुमार यांच्या नावे साडे सात एकरची नोंद आहे. प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या नावे वादीच्या परस्पर लागण नोंद दिलेली आहे. वादी व प्रतिवादी त्यांच्या पत्नी व मुलांचे आपआपसात पटत नसल्याने प्रतिवादी क्र. १ व २ एकत्र कुटुंबाचा ऊस त्यांच्या परस्पर त्यांच्या नावच्या जमिनीतील ऊस दुसऱ्या कारखान्यास घालण्याचा व रक्कम हडप करण्याचा प्रयत्न करत आहे.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत १फ ही त्यांचे व प्रतिवादी क्र. १ व ५ यांच्या नावे दिनांक ०८.०६.२००७ रोजी प्राधिकरणाकडुन भाडेपट्ट्याने मिळालेली आहे. सदर मिळकतीमध्ये डी. वाय. पाटील कॉलेज ही भागीदारी फर्म २००९ साली काढून त्या मिळकतीवर सव्वा कोटीचे कर्ज घेवून तीन मजली इमारत बांधली व त्यातून कर्ज फेडले. त्यानंतर २०१३-२०१४ साली एक कोटीचे अन्य कर्ज व्यवसाय विस्तारासाठी घेतले. त्याची फेड अद्याप चालु आहे. सदरची मिळकत देखील त्यांची व प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या मालकीची आहे व

त्यात त्यांचा अविभक्त हिस्सा आहे. सदर इमारतीमधील हॉस्टेलचे उत्पन्न सन २०१७ मध्ये प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांच्या नावे डी. वाय. पाटील बॉइज हॉस्टेल या नावाने संस्था काढून उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करु लागले. त्यांनी प्रतिवादी क्र. १ यास दावा कलम १ब या मिळकतीच्या उत्पन्नाचा खर्चाचा हिशोब मागितला असता, प्रतिवादी हिशोब देण्यास तयार नाही. म्हणून त्यांनी सदर मिळकतीचे वाटप करुन कब्जा मागितला असता, प्रतिवादींनी त्यास नकार दिला व त्यांचे समाईक कब्जे वहिवाटीस हरकत करुन त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न करुन एकट्याचा कब्जा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांना प्रस्तुतचा दावा व प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा कलम १फ (१) ही त्यांची व प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. तर, वराळे येथील सर्व्हे नं. २७/ए/अ/१/२सी ही मिळकत धर्मादाय न्यासाची असून, ती वाटपास पात्र नाही. तर, अकलूज येथील सर्व्हे नं. ८७/१/अ/१/फ/८ ही मिळकत प्रतिवादी क्र. ५ यांची असून, ती एकत्र कुटुंबाची नाही. तसेच, मानीवली येथील सर्व्हे नं. ८२१/१, अंबी येथील गट नं. १८९, सुप्रीम प्लाम येथील फ्लॅट नं. डी–९०१ व मंदनगड येथील सर्व्हे नं. १२८/१/अ व १२८/३ तसेच विन्हे येथील सर्व्हे नं. १२८/२/क, १२८/१/ब व १२८/२/ब या मिळकती वादीच्या स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केलेल्या आहेत.

**५.** प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी १४ कडे दाखल करुन वादीची सर्व कथने नाकारली.

**६.** प्रतिवादींचे असे कथन आहे की, प्रस्तुत अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आलेला नाही. त्याने एकत्र कुटुंबाच्या सर्व मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत. सदर मिळकतीमधील उत्पन्न हडप करणेकामी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १, २, ३ व ५ यांना वडिलार्जीत मिळकतीतून उत्पन्न घेता येवू नये, यामध्ये अडचण निर्माण करता आली तर पहावी या उद्देशाने अर्ज दाखल केला आहे. वादीने मौजे वराळे येथील सर्व्हे नं. २७/ए/अ/१/२सी यामधील इमारत, मौजे अंबी येथील सर्व्हे नं. १८९, मौजे मानीवली येथील सर्व्हे क्र. ८२१/१, मौहे बळेगांव येथील गट नं.९८३/४९ व मौजे अकलूज येथील गट नं. ८७/१/अ/१/फ/८ या मिळकती अर्जात व दाव्यामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत व खरी वस्तुस्थिती लपवून सदरचा अर्ज केलेला आहे.

**७.** प्रतिवादींचे असे कथन आहे की, मौजे वराळे येथे डॉ. डी. वाय. पाटील एजुकेशन फेडरशन ही संस्था सुशांत पाटील, निशांत पाटील, विजयकुमार पाटील, अनुजा कराडे व कोमल पाटील यांचे नावे शैक्षणीक ट्रस्ट म्हणून स्थापन केली आहे. सदर संस्थेची जागा ही एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून दीड कोटी रुपयात घेतलेली आहे. त्याबाबत खर्चाचा तपशीलाने दिलेला आहे. वादीने बेकायदेशीरपणे एकत्र

कुटुंबाच्या ट्रस्टमधील ट्रस्टींच्या परस्पर एकत्र कुटुंबाच्या मिळकतींमधील उत्पन्न एकट्याने हडप करण्याच्या उद्देशाने चुकीची कागदपत्रे बनविली आहेत व स्वतः ट्रस्टचा अध्यक्ष म्हणून गैरव्यवहार करत आहे. त्याबाबत सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अर्ज केला असून, तो प्रलंबित आहे. वादी हा एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या मिळकतीतील संपूर्ण फायदा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे त्यांनी एकत्र मिळकतीचा जाणुन–बुजून उल्लेख केला नाही. वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात आलेला नाही, त्याने न्यायालयापासून महत्वाच्या गोष्टी लपवून ठेवलेल्या आहेत, एकत्र कुटुंबाच्या मिळकती कॉमन हॉचपॉच मध्ये घेतलेल्या नाहीत व चुकीच्या माहितीच्या आधारे दावा दाखल केला. वरील परिस्थिती व कायदेशीर बाबी विचारात घेवून वादीचा निशाणी क्र. ५ चा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**<u>प्रतिवादीचा अर्ज निशाणी ३० मधील कथने व त्यावरील वादीचे म्हणणे खालीलप्रमाणेः</u>**

८. मौजे वराळे येथील सर्व्हे नं. २७/ए/अ/१/२सी, क्षेत्र १ हेक्टर २० आर व त्या मिळकतीमध्ये असणारी एक लाख चौरस फुटाची धर्मादाय न्यासाची इमारत, मौजे अंबी येथील सर्व्हे नं. १८९, मानीवली येथील सर्व्हे ८२१/१, बळेगांव येथील गट नं. ९८३/४९, अकलूज येथील गट नं. ८७/१/अ/१/फ/८, मौजे मंडनगड येथील गट नं. १२८/१/अ, १२८/३ व विन्हे येथील गट नं. १२८/२/क, १२८/१/ब, १२८/२/ब या मिळकतीं तसेच वादीचे विशेष दिवाणी

दावा क्र. ८९/२०२० मधील दावा कलम १अ ते १ई मध्ये नमूद केलेल्या मिळकतीं या अर्जाचा भाग आहे.

**९.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिदावा कम ३अ ते ३ऊ या संपूर्ण मिळकती स्पे.मु.नं. ८९/२०२० मध्ये नमूद केलेल्या मिळकतीतील उत्पन्नातून तसेच हिंदू एकत्र कुटुंबाच्या इतर उत्पन्नातून विकत घेतलेल्या आहेत. सदर मिळकती पैकी काही मिळकती कुटुंबाच्या सोयीसाठी कुटुंबातील व्यक्तीच्या नावे खरेदी केलेल्या आहेत. तसेच बऱ्याच मिळकती या प्रतिवादी क्र. १ च्या नावे खरेदी केलेल्या आहेत. वादी, प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाहीत.

**१०.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, ते पूर्वीपासून पुणे येथे राहत आहेत, तर वादी अकलूज येथे राहून शेती करत आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ हे प्रतिदावा कलम १अ ते १ऊ मध्ये नमूद केलेल्या मिळकतींचे वहिवाट व देखभाल करत होते. प्रतिवादींना वादी ट्रस्टच्या व्यवहारामध्ये मदत करत होते. वादी हे संस्थेतील येणाऱ्या रकमेचा गैरवापर सुरु केला व गैरकृत्ये करु लागला म्हणून त्याचे विरुद्ध सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे तक्रारी केल्या आहेत. त्याचे काम अद्याप चालु आहे. ते वादीस ट्रस्टचे हिशोबाबाबत विचारु लागले व कामामध्ये अडथळा करु नका असे म्हणू लागले. दरम्यानचे काळात त्यांचे वडील मयत झाल्यानंतर त्यांचेतील वाद अधिकच विकोपाला गेले. त्यानंतर वादी हे अकलूज येथे आले व त्यांना म्हणाले की,

जमीन तुला वहिवाटून देणार नाही व कोणत्याही जमिनीत येवून देणार नाही. संपूर्ण मिळकती माझ्या मालकीच्या आहेत असे म्हणून त्यांना हरकत अडथळा करुन हुसकून लावण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांनी त्यांचे विरुद्ध दिनांक १७.०७.२०२० रोजी फिर्याद दाखल केली आहे. वादीचा दावा मिळकतीशी काही संबंध नसताना संपूर्ण पीके त्यांनी स्वःखर्चाने जोपासली असताना वादीने त्याचे नावे सहकार महर्षी शंकरराव मोहीते पाटील सहकारी साखर कारखाना यांच्याकडे दिनांक १३.०७.२०२० रोजी खोटी नोंद दिली. त्याबाबत त्यांनी तक्रार केल्याने ती नोंद कारखान्याने रद्द केली. त्यावर चिडून जावून कोर्ट हुकुमाच्या आधारे मिळकत हडत करता आली तर पहावी या उद्देशाने सदरचा दावा दाखल केलेला आहे. तसेच वादीने खोटी नोंद देवून कारखान्याची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे.

**११.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिदावा कलम ३अ, ३ब मध्ये डी. वाय. पाटील एज्युकेशनल फेडरेशन ही धर्मादाय न्यास वादी, प्रतिवादीचे नावे विश्वस्त म्हणून स्थापन केली आहे. सदर संस्थेची जागा एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून रुपये दीड कोटी इतक्या रकमेस वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी न्यासाचे अधिकार धारण केलेली व्यक्ती म्हणून घेतलेली आहे. वादी हा सन २०१७ पासून न्यासामधील कोणत्याही स्वरुपाचा हिस्सा त्यांना देत नाही. न्यासाचा अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती केली असल्याने पदाचा गैरवापर करुन कोणत्याही स्वरुपाचा हिशोब देत नाही व एकटाच रक्कम हडप करण्याच्या प्रयत्नात आहे. सदर न्यासाच्या रकमेमध्ये व

स्थावर मिळकतीमध्ये त्यांचा हिस्सा आहे. वादीने अधिकाराचा गैरवापर करुन खोटा व बनावट ठराव पास करुन त्यांचा सह्याचा अधिकार काढून घेतला व स्वतःकडे व पत्नी अनुजा यांच्याकडे सह्यांचे अधिकार घेवून पत्नीस दरमहा रुपये एक लाख पगार दर्शवून अपहार करत आहे. त्यामुळे एकत्र कुटुंबाच्या न्यासामधील वापर, उपभोगास व न्यासाचे कामकाज पाहण्यापासून वंचीत करु नये म्हणून वादीचे विरुद्ध निरंतर ताकीद देणे आवश्यक आहे. म्हणून त्यांना स्पे.मु.नं. ८९/२०२० मध्ये नमूद संपूर्ण मिळकती व प्रस्तुत अर्जाच्या कलम १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण मिळकतीमधील एकत्र कुटुंबाच्या वहिवाटीतून त्यांना हुसकावून लावू नये तसेच मिळकत तबदील करु नये व संस्थेच्या कारभारात सहभागी होण्यास व कामे करण्यास वादीने बेकायदेशीरपणे हुसकावून लावू नये व अधिकाराचा गैरवापर करु ढवळाढवळ करु नये अशी मनाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले.

**१२.** वादीने त्याचे म्हणणे निशाणी ३८ कडे दाखल करुन तो त्यातील मजकूर खरा, बरोबर व कायदेशीर नसून तो त्यांनी अमान्य केला. वादीने दावा कलम १अ ते १फ (१) या मिळकतीसाठी प्रतिवादीं विरुद्ध वाटपाचा व निरंतर ताकीदीचा दावा दाखल केला आहे. त्या मिळकती सोडून प्रतिवादींनी प्रतिदाव्यात कलम ३अ ते ३ऊ या मिळकतीसाठी प्रतिदावा दाखल केला आहे. तो कायद्याने चालणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज देखील कायद्याने चालणारा नाही.

**१३.** वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिदावा कलम ३अ व ३ब या मिळकती महाराष्ट्र पब्लीक ट्रस्ट ॲक्ट मधील तरतूदीप्रमाणे ट्रस्टच्या मिळकती आहेत. त्या मिळकतीबाबत दावा करावयाचा झाल्यास धर्मादाय आयुक्तांची परवानगी आणल्याशिवाय दिवाणी न्यायालयात दावा चालत नाही व तसा दिवाणी न्यायालयास हक्क व अधिकार नाही. प्रतिदावा कलम ३अ व ३ब या मिळकतीबाबत दिवाणी न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकारच नसल्याने त्या मिळकतीबाबत तुर्तातुर्त ताकीद अर्ज देखील चालण्यास पात्र नाही. तसेच प्रतिदावा कलम ३अ व ३ब या मिळकतीत डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन फेडरेशन ही संस्था असून, धर्मादाय आयुक्त पुणे यांनी नोंदणी प्रमाणपत्र दिलेले आहे व त्यामध्ये विविध महाविद्यालये चालु आहेत व सदर संस्थेचे वादी विश्वस्त आहे व संस्थेचा कारभार धर्मादाय आयुक्त यांचे नियमानुसार चालु असतो व त्यावर धर्मादाय आयुक्तांचे नियंत्रण असते. त्यामुळे सदर मिळकतीबाबत तुर्तातुर्त ताकीद देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच त्या मिळकती ट्रस्टच्या मिळकती असल्याने ती वाटपास देखील नाही.

**१४.** वादीचे पुढे असे कथन आहे की, मौजे अंबी येथील सर्व्हे नं. १८९, मानीवली येथील सर्व्हे नं. ८२१/१ या मिळकती वादीने स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी घेतल्या आहेत. तसेच मंडनगड येथील मिळकती देखील वादीने स्वतंत्ररित्या खरेदी घेतलेल्या आहेत. तसेच फ्लॅट नं.डी–९०१ हा वादीने युनीयन बँक ऑफ इंडियाचे रुपये चाळीस लाखाचे कर्ज घेवून खरेदी घेतला आहे व त्याचे हफ्ते देखील तो भरत

आहे. वादी व त्याची पत्नी यांनी स्वतःच्या उत्पन्नातून प्रतिदावा कलम १क, १ड, १उ व १ऊ या मिळकती खरेदी घेतलेल्या आहेत व त्या रकमेबाबत आयकर परताव्यामध्ये व ताळेबंद पत्रकात दर्शविलेल्या आहेत व वादीनी प्रतिवादींच्या अर्जातील इतर कथने अमान्य करुन अर्ज रुपये एक लाखचे कॉम्पेनसेटरी कॉस्टसह नामंजूर करण्याची विनंती केली.

**१५.** उभय पक्षकारांनी केलेल्या कथनांवरुन खालील वादप्रश्न माझे विवेचनार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सकृतदर्शनी प्रकरण कोणास आहे ? | **'वादी व प्रतिवादीस'** |
| २. | सोयीच्या समतोलाचा काटा कोणाच्या लाभात झुकत आहे ? | **'वादी व प्रतिवादीच्या'** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास, अपरिमित नुकसान कोणाचे होणार आहे ? | **'वादी व प्रतिवादीस'** |
| ४. | आदेश काय ? | **'अंतिम आदेशाप्रमाणे'** |

## कारणमिमांसा

### वादप्रश्न क्र. १ ते ३ करीताः

**१६.** वादीचे विद्वान विधिज्ञ श्री. आर. एस. वाघमोडे यांनी युक्तिवाद केला की, उभय पक्षकारांमधील नातेसंबंध ही मान्य बाब आहे. प्रस्तुत प्रकरणातील प्रबळ

दावेदार प्रतिवादी क्र. १ ते ३ आहेत. प्रतिवादी व वादीचे वडील विजयकुमार हे दिनांक ३०.०३.२०२० रोजी मयत झाले. दावा मिळकती १अ ते १फ (१) या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत, ही देखील मान्य बाब आहे. त्याच्यामध्ये अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही ही देखील मान्य बाब आहे. लवंग येथील मिळकतीमध्ये ऊसाचे पीक उभे आहे. ते प्रतिवादींनी वादीचे अपरोक्ष साखर कारखान्यास घातलेले आहे व ते आता वादीस दावा मिळकतीत येण्यास हरकत अडथळा करत आहेत. वडिलांचे पश्चात वादी, प्रतिवादी मधील संबंध विकोपास गेले आहे. त्यामुळे समाईक वहिवाटीस हरकत व विक्री करु नये याचे मनाईसाठी अर्ज दाखल करणे भाग पडले व शेवटी त्यांनी अर्ज निशाणी ५ मंजूर करुन अर्ज निशाणी ३० नामंजूर करण्याची विनंती केली व त्यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

1. 2007 (1) P.C.R. (Civil) 387 New India Construction Co. Ltd. vs. Deshraj & Ors.
2. 2003 (2) P.C.R. (Rent) 117 T. Laxmipathi & Ors. vs. P. Nityanand Reddy & Ors.
3. 1999 (4) All M. R. 327 M/s. Jyoti Homemakers Pvt. Ltd. vs. M/s. Gundalekar Holdings Pvt. Ltd. & Ors.

**१७.** याउलट, प्रतिवादींचे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. निंबाळकर यांनी युक्तिवाद केला की, दावा कायद्याने चालण्यास पात्र नसल्याने, प्रस्तुत अर्ज देखील चालण्यास पात्र नाही. ऊस बीलाची रक्कम हडप करण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल

केलेला आहे. मिळकत खरेदी केल्यानंतर वादी व प्रतिवादींनी संयुक्तरित्या निधी जमवला आहे. त्यामुळे न्यासाची मिळकत देखील एकत्र कुटुंबाची आहे. वादी हा न्यासाच्या रक्कमा परस्पर हडप करु लागला. त्यास प्रतिवादींनी हरकत घेतली म्हणून प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे व निशाणी ३३ कडील अर्ज हा पूर्वग्रहदूषीत हेतुने जाणीवपूर्वक दाखल केला आहे. वादीने त्याची केस स्वतः शाबीत करावयाची आहे. त्याने ऊस पीक जमा केल्याबाबतचे कागदपत्र स्वतः दाखल केले पाहीजेत. वादी हा रकमेच्या वसूलीकरीता दावा दाखल करु शकतो. ती रक्कम या दाव्यात मागू शकत नाही. दरम्यानचे उत्पन्न न मागता प्रस्तुत दावा दाखल केल्याने दावा व अर्ज चालण्यास पात्र नाही. तसेच हॉस्टेलची मिळकत ही ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याने आहे. त्या वाटप मागितले आहे. ते देता येणार नाही. वादीने नावाचा वापर करुन रकमेचा अपहार केला आहे व शेवटी त्यांनी अर्ज निशाणी ५ नामंजूर करुन अर्ज निशाणी ३० मंजूर करण्याची विनंती केली.

**१८.** वादीने त्याचे अर्जाचे समर्थनार्थ निशाणी ४ व २४ कडे खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत. तर, प्रतिवादीने त्यांचे अर्जाचे समर्थनार्थ निशाणी १८ व ३७ कडे कागदपत्रे सादर केली आहेत.

**१९.** निशाणी क्र. ४/१ व ४/२ कडील दाखल केलेल्या ७/१२ च्या उताऱ्याचे अवलोकन केले असता, वादीचे दावा कलम १अ मधील मिळकत ही वादी व त्यांचे वडील, पत्नी अनुजा यांच्या नावावर असल्याचे दिसते. तर, निशाणी क्र.

४/३ ते ४/१० कडे दाखल केलेल्या उताऱ्यांवरुन दावा मिळकत १ब पैकी गट नं. २४२/१ व २४१ हे प्रतिवादी क्र. १ व ५ चे नावे, तर उर्वरीत मिळकती या प्रतिवादी क्र. ५ च्या नावे असल्याचे दिसते. तर, निशाणी क्र. ४/११ ते ४/१३ कडे दाखल केलेल्या उताऱ्यांवरुन दावा कलम १क मधील नमूद मिळकती या वादी, प्रतिवादींचे वडील विजयकुमार यांच्या नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र. ४/१४ कडील ७/१२ चे उताऱ्यावरुन दावा मिळकत १ड ही प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावे असल्याचे दिसते. तर, निशाणी क्र. ४/१५ व ४/१६ कडे दाखल केलेल्या उताऱ्यांवरुन दावा मिळकत १इ या मिळकती प्रतिवादी क्र. १ व ३ च्या नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र. ४/१७ व ४/१८ कडे दाखल केलेल्या उताऱ्यांवरुन दावा मिळकत १ई ही वादी, प्रतिवादींचे वडील विजयकुमार यांच्या नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र. ४/१९ ते ४/२१ कडे दाखल केलेल्या सूची क्र. २ वरुन दावा मिळकत १फ मध्ये नमूद केलेले फ्लॉट हे वादी, प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ५ च्या नावे असल्याचे दिसते. तर, निशाणी क्र. १८/५ कडे दाखल केलेल्या ७/१२ च्या उताऱ्यावरुन दावा मिळकत १फ१ तथा प्रतिदाव्यातील मिळकत ३ई ही प्रतिवादी क्र. १ नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र. १८/३ कडे दाखल केलेल्या उताऱ्यावरुन प्रतिदावा कलम ३अ व ३ब ह्या मिळकती डी. वाय. पाटील एज्युकेशन फेडरेशन या संस्थेच्या नावे असल्याचे दिसते व त्यास निशाणी क्र. २४/१६ कडील सूची क्र. २ ने परिपुष्टी येत असल्याचे दिसते. निशाणी क्र. २४/१३ कडे दाखल

केलेली सूची क्र. २ व निशाणी क्र. १८/१ कडे दाखल केलेल्या ७/१२ च्या उताऱ्यावरुन प्रतिदावामधील ३क ही मिळकत वादीच्या नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र. १८/२ कडे दाखल केलेल्या उताऱ्यावरुन प्रतिदावा कलम ३ड मधील मिळकत ही वादीच्या नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र. १८/४ कडे दाखल केलेल्या उताऱ्यावरुन प्रतिदाव्यातील मिळकत ३ई तथा दाव्यातील कलम ६अ मध्ये नमूद मौजे अकलूज येथील मिळकत ही प्रतिवादी क्र. ५ चे नावे असल्याचे दिसते. निशाणी क्र.२४/२ कडे दाखल केलेल्या खरेदीपत्रावरुन प्रतिदावा कलम ३उ या मंडनगड येथील मिळकती वादीच्या नावे खरेदी घेतल्याचे दिसते. तर निशाणी क्र. २४/३ ते २४/४ कडे दाखल केलेल्या खरेदीपत्रावरुन प्रतिदावा कलम ३ऊ मधील नमूद मौजे विन्हे येथील मिळकती वादीच्या नावे खरेदी घेतल्याचे दिसते. निशाणी क्र. २४/१३ कडे दाखल केलेल्या सूची क्र. २ व निशाणी क्र. १८/१ कडे दाखल केलेल्या ७/१२ च्या उताऱ्यावरुन प्रतिदावा कलम ३क मधील नमूद मिळकत ही वादीच्या नावे खरेदी घेतल्याचे दिसते. निशाणी क्र. २४/६ कडे दाखल केलेले खरेदीपत्र व २४/७ कडे दाखल केलेला सूची क्र. २ व निशाणी क्र. १८/२ कडे दाखल केलेल्या उताऱ्यावरुन प्रतिदावा कलम ३ड मधील नमूद मिळकत ही वादीच्या नावे खरेदी घेतल्याचे दिसते. वादी, प्रतिवादीतर्फे दाखल केलेल्या उपरोक्त कागदपत्रांवरुन दावा व प्रतिदावा यामध्ये नमूद केलेल्या मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या नावे घेतल्याचे दिसते.

**२०.** वादी, प्रतिवादी यांचेतील नातेसंबंध उभयतांनी नाकारलेला नाही. निशाणी क्र. ४/२२ कडे दाखल केलेला फेरफार क्र. ४२८४ चे अवलोकन केले असता, वादी, प्रतिवादींचे वडील विजयकुमार यांचे पश्चात पत्नी विजयश्री प्रतिवादी क्र. ५, प्रतिमा प्रतिवादी क्र. ४, अमृता प्रतिवादी क्र. ७, निशांत प्रतिवादी क्र. १ व सुशांत वादी यांची वारस म्हणून नोंद झाल्याचे पहावयास मिळते. दावा व प्रतिदावा मिळकती ह्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतून खरेदी घेतल्याचे वादी, प्रतिवादींनी कबूल केलेले आहे. सबब, वादी, प्रतिवादी हे सहहिस्सेदार आहेत. सहहिस्सेदाराच्या विरुद्ध मनाई आदेश देता येत नाही हे कायद्याचे प्रस्थापित तत्व आहे. वादीचे कथनानुसार दावा मिळकत १अ मधील मिळकतीमधील ऊसाचे पीक प्रतिवादींनी परस्पर त्यांचे नावे साखर कारखान्यास घालून त्याचा मोबदला घेतला आहे. सदर मिळकतीमध्ये ऊस लागण नोंद वादीच्या नावे झाल्याचे निशाणी क्र. ४/२३ ते ४/२५ कडे दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

**२१.** वादीतर्फे दाखल ***2003 (2) P.C.R. (Rent) 117 T. Laxmipathi & Ors. vs. P. Nityanand Reddy & Ors.*** या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. त्यामध्ये एक सह–हिस्सेदार हा संपूर्ण मिळकतीचा ताबा घेवू शकत नाही. तसेच मिळकतीस नुकसान अथवा मिळकतीचा गैरवापर करुन बेदखल करत असेल अशावेळी त्याला मनाईचा आदेश देवून परावृत्त करता येईल. हाती असलेल्या प्रकरणी, प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा कलम १अ मधील मिळकत,

जी वादीच्या नावे आहे व त्यामधील ऊस पीकाची लागण वादीच्या नावे असून सुद्धा त्यामधील ऊसाचे पीक स्वतःच्या नावे साखर कारखान्यास देवून त्याचा मोबदला घेत आहेत. प्रतिवादी ही कृती दावा मिळकत १अ च्या संदर्भाने वादीच्या हिताच्या विरुद्ध असल्याने उपरोक्त नमूद न्यायनिर्णयामधील विशद केलेले तत्व विचारात घेता, केवळ दाव मिळकत १अ चे संदर्भाने वादीचे ताबेकब्जास हरकत अडथळा करु नये असा मनाई आदेश देणे उचीत ठरेल.

२२. वादी, प्रतिवादींनी दावा मिळकत तसेच प्रतिदावा मिळकतीमधील त्यांचे कब्जास हरकत अडथळा करु नये व त्यात तबदील करु नये अशा मनाईची मागणी केली आहे. वादीने प्रस्तुत दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. तर, प्रतिवादीने देखील प्रतिदाव्याद्वारे वाटपाची मागणी केली आहे. वाटपाच्या दाव्यात एका पक्षकाराचा ताबा हा सर्व पक्षकारांचा ताबा असतो. अशा परिस्थितीत वादी, प्रतिवादींनी एकमेकांच्या विरुद्ध दावा मिळकत व प्रतिदावा मिळकत तबदील करु नये अशी मनाई मागितली आहे. जर, वादीने दावा मिळकत तबदील केली तर प्रतिवादीचे व जर प्रतिवादीने मिळकत तबदील केली तर, वादीचे नुकसान होणार आहे. सबब, सकृतदर्शनी केस, सोयीच्या समतोलाचा काटा व होणारे अपरिमीत नुकसान हे केवळ वादीचे होणार नसून, ते प्रतिवादीचे देखील होणार आहे.

२३. प्रतिवादींनी वादीने दाव्यात सर्व मिळकती समाविष्ट केल्या नाहीत असा आक्षेप घेतला. त्यानंतर वादीने दुरुस्ती करुन त्या दाव्यात समाविष्ट करुन त्या

त्यांच्या स्वःकष्टार्जीत मिळकती असल्याचे कथन केले. दावा मिळकती ह्या वादी म्हणतो त्याप्रमाणे स्वःकष्टार्जीत आहेत अथवा प्रतिवादी म्हणतो त्याप्रमाणे त्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून वादीच्या नावे खरेदी घेतल्या आहेत या बाबीं अंतिम पुराव्याच्यावेळी ठरणार आहेत. मनाई अर्जाचावेळी प्रामुख्याने सकृतदर्शनी केस, सोयीच्या समतोलाचा काटा व अपरिमीत हानी या तत्वांचा विचार केला पाहीजे.

**२४.** माझे उपरोक्त विवेचनावरुन, वादी केवळ दावा कलम १अ या मिळकतीवरील ताबेकब्जास हरकत अडथळा करण्याबाबतचा मनाई आदेश प्रतिवादीं विरुद्ध मिळणेस पात्र आहे. तसेच, उभयतांना दावा मिळकत तसेच प्रतिदावा मिळकत तबदील करण्यास प्रस्तुत दाव्याचा व प्रतिदाव्याचा निकाल होईपर्यंत मनाई केल्यास उभयतांचे काही नुकसान होईल असे वाटत नाही. तसेच, निशाणी क्र. ३३ कडील आदेशानुसार प्रतिवादींचा प्रतिदावा हा प्रतिदाव्यातील मिळकत ३अ व ३ब वगळून घेण्याचा आदेश केल्याने सदर मिळकतीबाबत कोणताही आदेश करणे उचीत होणार नाही. वादी, प्रतिवादी यांचेतील नातेसंबंध विचारात घेता, अर्जाचा खर्च कुणाएका पक्षकारावर लादल्यास ते त्यांच्यामध्ये असलेल्या संबंधामध्ये आणखीनच वितुष्ट निर्माण करण्यासारखे होईल. सबब, अर्जाचा खर्च ज्याचा त्यास सोसावयाचा आदेश केल्यास ते न्यायोचीत होईल. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष येणेप्रमाणे नोंदवून, मुद्दा क्र. ४ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी ५ अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी दावा कलम १अ मध्ये नमूद मिळकतीवरील वादीचे ताबेकब्जास हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश प्रस्तुत दाव्याच्या निकालापर्यंत करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी दावा कलम १अ ते १फ१ या मिळकतींची खरेदी, विक्री, गहाण, दान, लीज इत्यादी मार्गाने तबदील करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश प्रस्तुत दाव्याच्या निकालापर्यंत करण्यात येतो.

४. अर्ज निशाणी क्र. ३० अंशतः मंजूर करण्यात येतो.

५. वादीने त्याच्या दाव्यात नमूद केलेल्या मिळकती व प्रतिदावा कलम ३क ते ३ऊ मध्ये नमूद मिळकतींची खरेदी, विक्री, गहाण, दान, लीज इत्यादी मार्गाने तबदील करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश प्रस्तुत दाव्याच्या निकालापर्यंत करण्यात येतो.

६. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावयाचा आहे.

माळशिरस. **(र. सु. क्षीरसागर)**
दि. ०४/०२/२०२१. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | **N. N. Konda, Grade-II** |
| (b) | Court | : | **Civil Court Senior Division, Malshiras.** |
| (c) | Judgment signed by P.O. on | : | **05.02.2021.** |
| (d) | Judgment uploaded on | : | **05.02.2021.** |